प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

नोव्हेंबर 5, 2018

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 35अ खालील निर्देश - वसंतदादा नागरी सहकारी बँक लि., उस्मानाबाद, महाराष्ट्र - मुदतवाढ**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 35अ च्या पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, जनहिताच्या दृष्टीने, **वसंतदादा नागरी सहकारी बँक लि., उस्मानाबाद, महाराष्ट्र** हयांना नोव्हेंबर 13, 2017 रोजीचे व्यवहार बंद झाल्यापासून निर्देश दिले होते. भारतीय रिझर्व बँकेने आता हया निर्देशांना चार महिन्यांची, म्हणजे नोव्हेंबर 14, 2018 ते मार्च 13, 2019 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. हया निर्देशांच्या अटीनुसार, ठेवींची निकासी/स्वीकार करण्यावर काही निर्बंध आणि/किंवा मर्यादा घालण्यात आली आहे. संबंधित जनतेच्या माहितीसाठी सविस्तर निर्देश बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आले आहेत. परिस्थितीवर अवलंबून, वरील निर्देशात बदल करण्याचा विचार भारतीय रिझर्व बँक करु शकते. हे निर्देश देण्यात आले हयाचा अर्थ, भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे असा घेण्यात येऊ नये. वरील बँकेची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत ती, बँकिंग व्यवसाय निर्बंधांसह करणे सुरु ठेवू शकते.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1053**